महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@mah.gov.in	दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संगणक- २०२५/प्र.क्र.३४/का. ७	दिनांक :११ जूलै, २०२५.

## निविदा सूचना

विधि व न्याय विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई या विभागाला कार्यालयीन कामकाजासाठी लागणाऱ्या प्रिंटरच्या Compatible टोनर व ड्रम पुरवठा करण्यासाठी दि.०१.०८.२०२५ ते दि.३१.०७.२०२६ या एक वर्ष कालावधीसाठी दरकरार करण्याकरीता मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. मोहोरबंद लिफाफ्यावर “Compatible टोनर व ड्रम पुरवठा करण्याबाबत निविदा-२०२५-२६” असे स्पष्टपणे लिहिणे आवश्यक आहे. निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन Compatible टोनर व ड्रम पुरविण्याबाबतचे दर तांत्रिक लिफाफा व अतांत्रिक लिफाफा असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे (सोबत जोडलेल्या नमुन्यात) कार्यासन अधिकारी (कार्यासन-७), दालन क्रमांक ३५३, तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे दि.२२.०७.२०२५ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत. त्यानंतर आलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर न केल्यास निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. निविदा फॉर्मवर निविदाधारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. प्राप्त निविदा मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी यांनी दिलेल्या दिनांकास व वेळेला मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी, पाचवा मजला, मुख्य इमारत, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२ येथे उघडण्यात येतील. निविदा धारकांना निविदा उघडण्याची दिनांक व वेळ पत्राद्वारे/दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. निविदा मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल (मंत्रालय प्रवेश नियमानुसार).

५. निविदा फि रु.३४००/- इतकी रक्कम (ना परतावा) शुल्क रोखीने कक्ष अधिकारी (रोखशाखा), विधि व न्याय विभाग, कक्ष क्र.३५३, तिसरा मजला, मंत्रालय विस्तार, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ येथे भरावे. त्याची मूळ प्रत “लिफाफा १ तांत्रिक विवरणपत्र” सोबत जोडणे आवश्यक आहे. निविदाकार जर सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असेल तर अशा निविदाकारांना निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सुट देण्यात येत आहे.

६. रुपये १८,०००/- (अक्षरी रुपये सोळा हजार फक्त) बयाणा रकमेचा (EMD) "अवर सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई" यांच्या नावे काढलेला धनाकर्ष/धनादेश तांत्रिक लिफाफ्यासोबत अनुक्रमांक २ येथे दर्शविलेल्या पत्त्यावर जमा करण्यात यावा. निविदाकार जर सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असेल तर अशा निविदाकारांना निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सुट देण्यात येत आहे.

८. यशस्वी पुरवठादाराने कक्ष अधिकारी (रोखशाखा), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे रु.३०,०००/- (अक्षरी रुपये तीस हजार फक्त) ची बँक गॅरंटी विभागाकडे जमा करावी लागेल. त्यावर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

**प्रिंटरच्या टोनर व ड्रम बाबतीत निविदेच्या अटी व शर्तीचा तपशिल पुढीलप्रमाणे:-**

१. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी केलेल्या नवीन टोनरचा पुरवठा तात्काळ (२४ तासांच्या आत) व स्वीकृत निविदेत्तील ब्रॅन्डेड कंपनीचा व उत्तम दर्जाचा करणे पुरवठादारांवर बंधनकारक राहील व तसे न केल्यास प्रतिदिन रुपये ५००/- प्रति टोनर एवढा दंड आकारण्यात येईल.

२. नवीन टोनरचा पुरवठा केल्यानंतर १५ दिवसानंतर मुद्रांक पावतीसहीत देयके सादर करावीत. देयकांची रक्कम पुरवठादारास अदा करण्यासाठी, पुरवठादाराने कक्ष अधिकारी (कार्या-७), विधि व न्याय विभाग, तिसरा मजला, मंत्रालय विस्तार, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे बँकेच्या खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील. सर्व परिपूर्ण माहितीसह देयके सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

३. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

४. कोणतेही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा निविदा स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किया रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

५. आपल्या संस्थेने मागील ३ वर्षात शासकीय/निमशासकीय कार्यालयांना टोनर पुरविण्याबाबतचे कार्यादेश तसेच समाधानकारक काम केल्याबाबतचे संबधित कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

६. जेव्हा ओरीजनल टोनरची मागणी करण्यात आली असेल तेव्हा ओरीजनल टोनर पुरविणे आवश्यक आहे. पुरविण्यात आलेला टोनर बनावट (डुप्लीकेट) असल्याची शंका आल्यास कंपनीकडून तपासणी करुन घेण्यात येईल.

७. प्रिंटींगचा दर्जा उत्तम असेल.

८. विभागाच्या मागणीनुसार नवीन टोनर तात्काळ पुरविण्यात यावेत. पुरविण्यात आलेल्या टोनरमध्ये काही दोष आढळून आल्यास पुरवठादाराने टोनर निःशुल्क व तात्काळ बदलून देणे आवश्यक राहील.

९. टोनरमुळे प्रिंटर नादुरुस्त झाल्यास, प्रिंटरच्या दुरुस्तीचा खर्च देईल अथवा प्रिंटर दुरुस्त करुन देणे आवश्यक राहील.

१०.निविदा कालावधीमध्ये डुप्लीकेट टोनर पुरवठा केल्याचे निष्पन्न झाल्यास पुरवठादार/पुरवठादार संस्थेस सुयोग्य दंड आकारण्याचे व शिक्षा करण्याचे अधिकार शासनास असतील.

११.नवीन टोनरमधून आवश्यक किमान समाधानकारक प्रती उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर टोनर निःशुल्क बदली करुन देणे आवश्यक राहील व यासाठी रु.१०००/- प्रति टोनर इतका दंड आकारण्यात येईल.

१२.उपरोक्त अटी शर्ती मान्य असल्याचे "तांत्रिक दरपत्रक फॉर्म अ" मध्ये नमूद असेल तरच निविदाकाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

१३.आपली सेवा समाधानकारक नसल्यास, कोणतेही कारण न देता (कराराची मुदत वाढविणे, कमी करणे किंवा सेवाकरार रद्द करणे यापैकी सोईस्कर असलेला निर्णय आपणास बंधनकारक राहील) सदर सेवा करार भंग करण्याचे अधिकार प्रधान सचिव व विधि परामर्शी विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे राहतील. त्याचप्रमाणे पुढील सेवाकरार होईपर्यंत विभागास आवश्यकता भासल्यास त्याच दरात आणि अटी व शर्तींच्या अधीन राहून सेवासुविधा पुरविणे आपणास बंधनकारक राहील.

१४.निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या पुरवठादारास उपरोक्त मुद्या क्र.१ ते १३ या बाबींची लेखी हमी तसेच कोणत्याही विभागातर्फे काळ्या यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याची हमी रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर दयावी लागेल.

उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे तांत्रिक लिफाप्यामधील फॉर्म “अ” मध्ये नमूद असेल तरच निविदाकाराच्या निविदेबाबत विचार करण्यात येईल.

(गिता यादव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवड नस्ती, का. ७.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संगणक- २०२५/प्र.क्र.३४/का. ७ दिनांक : ११ जूलै, २०२५.

Compatible टोनर व ड्रम पुरवठा करण्यासाठी निविदा
लिफाफा १ : तांत्रिक दरपत्रक (प्रपत्र-अ)

| | | |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे/पुरवठादाराचे /संस्थेचे नाव | |
| २ | कार्यालयाचा संपूर्ण पत्ता ( पुरावा सोबत जोडण्यात यावा) उदा. महानगरपालिकाचे कर भरणा देयक/दुरध्वनी देयक किंवा विद्युत भरणा देयकांची छायाकिंत प्रत. | |
| ३ | दूरध्वनी (कार्यालय):- | |
| ४ | मोबाईल क्रमांक :- | |
| ५ | ई-मेल:- | |
| ६ | आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) छायांकित प्रत तसेच मागील तीन वर्षाचे आयकर भरणा करण्यात आलेल्या प्रतीची छायांकित प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी . | |
| ७ | वस्तू व सेवा कर ( GST ) प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी . | |
| ८ | व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणा-या विविध नोंदण्या:- उदा:- दुकाने व संस्था अधिनियम १९४८: प्रमाणपत्र देणारे कार्यालय/प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत त्याचप्रमाणे उद्योग आधार कार्यालय/ प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत इ. छायाकिंत प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी. | |
| ९ | आपल्या संस्थेने मागील ३ वर्षात शासकीय/निमशासकीय कार्यालयांना Compatible टोनर व ड्रम पुरविण्याबाबतचे कार्यादेश तसेच समाधानकारक काम केल्याबाबतचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. | |
| १० | निविदा सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती १ ते १३ मान्य असल्याबाबत तसेच कोणत्याही विभागातर्फे काळया यादीमध्ये समावेश नसल्याबाबत हमी निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या पुरवठादाराने रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर द्यावी लागेल. | |

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

दिनांक :

स्थळ :

सूचना:- दरामध्ये गिरवणे (ओव्हररायटिंग) तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड पांढरी शाई लावणे टाळावे तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी.
निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संगणक- २०२५/प्र.क्र.३४/का. ७ दिनांक : ११ जूलै, २०२५.

Compatible टोनर व ड्रम पुरवठा करण्यासाठी दरपत्रक
लिफाफा २ : अतांत्रिक वित्तीय दरपत्रक (प्रपत्र-ब)

१. निविदाधारकाचे/पुरवठादाराचे पूर्ण नांव : ------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता : ------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक :अ) कार्यालय: ------------------ ब)मोबाईल नं. --------------------

४. E-mail Address: -------------------------------------------------------

**सूचना:-** दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे (ओव्हररायटिंग) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

विभागातील प्रिंटर्स/टोनरची यादी

| अ. क्र. | टोनर नाव | नग | टोनरमधून निघणाऱ्या अंदाजित प्रतींची संख्या | टोनर (प्रती नग) दर (रुपये) | जीएसटी | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॅनन प्रिंटर मॉडेल ३२६ टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| २ | कॅनन प्रिंटर मॉडेल ३१९ टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| ३ | कॅनन प्रिंटर मॉडेल ०७१ टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| ४ | कॅनन प्रिंटर मॉडेल ०७० टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| ५ | कॅनन प्रिंटर मॉडेल २७७ A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| ६ | कॅनन प्रिंटर मॉडेल २७८ A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| ७ | कॅनन प्रिंटर मॉडेल ०५१ टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| ८ | कॅनन प्रिंटर मॉडेल १५२ A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ब्रदर प्रिंटर मॉडेल ३२५० टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| १० | ब्रदर प्रिंटर मॉडेल २३६५ टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| ११ | ब्रदर प्रिंटर मॉडेल ३२५० टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| १२ | ब्रदर प्रिंटर मॉडेल HL २०८० टोनर क्र.DR-B ०२१/०२० (कॉम्पटेबल) | | | | | |
| १३ | ब्रदर प्रिंटर मॉडेल २०८० ड्रम (कॉम्पटेबल) | | | | | |
| १४ | ब्रदर प्रिंटर मॉडेल २३६५ ड्रम (कॉम्पटेबल) | | | | | |
| १५ | सॅमसंग प्रिंटर मॉडेल २०५० टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| १६ | सॅमसंग प्रिंटर मॉडेल २०५ टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| १७ | एच पी प्रिंटर मॉडेल १८A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| १८ | एच पी प्रिंटर मॉडेल ३०A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| १९ | एच पी प्रिंटर मॉडेल २३०A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| २० | एच पी प्रिंटर मॉडेल ८८A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| २१ | एच पी प्रिंटर मॉडेल ३८८A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| २२ | एच पी प्रिंटर मॉडेल १९A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| २३ | एच पी प्रिंटर मॉडेल १३७/१३७A टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| २४ | एच पी प्रिंटर मॉडेल ३२A ड्रम (कॉम्पटेबल) | | | | | |
| २५ | लेक्समार्क प्रिंटर मॉडेल MS३१० टोनर (कॉम्पटेबल) | | | | | |
| २६ | लेक्समार्क प्रिंटर मॉडेल MS३२१ टोनर (कॉम्पटेवल) | | | | | |
| २७ | एच पी प्रिंटर मॉडेल ७७A टोनर (कॉम्पटेवल) | | | | | |

दिनांक :

स्थळ :

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.